## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम७७(ब-१),फ-४अन्वये दुरुस्ती आदेश

---

८७५ •जा.क्र.वि३/ड्रिमसिटी हौ.सो/प्रा.अ.नि./दु.आ./२०१८
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका
नाशिक यांचे कार्यालय, सहकार संकुल, नॅशनल
ऊर्दू हायस्कूल जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक २३/०३/२०१८

**वाचावे :-**
१) चेअरमन, ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., नाशिक यांचे दिनांक १०/०१/२०१८ चे पत्र व त्यासोबतचे समिती सदस्यांचे राजीनामे.
२) इकडिल नोटीस जा.क्र.वि-३/ड्रिमसिटी/हौ.सो/क.७७(अ)/नोटीस/१७, दिनांक २०/०७/२०१७
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चेकलम ७७(ब-१) व फ-४ मधील तरतुद.
४) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र वि-३/ ड्रिमसिटी हौ.सो/प्रा.अ.नि./आ/१८ दि.१/२/२०१८
५) श्री आर.सी.गजरे यांचे लेखी पत्र दि.२२/३/२०१८.

ज्याअर्थी, ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.,टाकळीरोड,नाशिक ता.जि.नाशिक ही संस्था (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये (ज्याचा उल्लेख या पुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे. संस्था व्यवस्थापनाने संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम व मंजुर उपविधीतील तरतुदी नुसार चालविणे बंधनकारक आहे.

DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES
NASIK TALUKA NASIK

२/- ज्याअर्थी, या कार्यालया कडिल नोटीसीत नमुद मुद्दे, अधिनियम, नियम व उपविधीतील तरतुदी यांचे अवलोकन करता, संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम, व उपविधीतील तरतुदी नुसार सुरु नसल्याचे आणि संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापना मध्ये पोकळी निर्माण झाली आहे, या निष्कर्षाप्रत येणे क्रमप्राप्त आहे.यावरुन त्यांना संस्थेच्या कामकाजात स्वारस्य नसल्याचे दिसुन आलेले होते , त्यामुळे संदर्भ क्र ४ नुसार प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री आर.सी.गजरे,सहकार अधिकारी व्दि.श्रे. यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) (१) (१-अ) (ब-१) फ- ४ मधील तरतुदी नुसार,संस्थेचे प्राधिकृत अधिकारी श्री आर.सी.गजरे यांनी या कार्यालयास लेखी पत्र देवुन सदर संस्थेचा पदभार अन्य अधिकारी यांचेकडे सुपुर्द करणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांच्याकडे अनेक सहकारी संस्थांचे प्राधिकृत अधिकारी पदाचा पदभार असल्याने त्यांना सदर संस्थेस पुरेसा वेळ देणे शक्य नाही,असे नमुद केलेले आहे.

४/- त्याअर्थी, नमूद संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत मी खालील प्रमाणे

# दुरुस्ती आदेश

ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि,टाकळीरोड,नाशिक ता.जि.नाशिक या संस्थेच्या समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ ब-१ व फ मधील ४ च्या तरतुदीचा वापर करुन नमूद संस्थेचा कारभार चालविण्यासाठी या कार्यालयाच्या आस्थापनेवरील श्री आर.सी.गजरे यांचे ऐवजी **श्री पी.आर.शिंपी,सहकार अधिकारी प्र.श्रे. अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक तालुका,नाशिक** यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्यांने संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया पदभार स्विकारले पासुन तीन महिन्याच्या आंत राबविणे कामी मतदार याद्या मुदतीत या कार्यालयाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदरचा दुरुस्ती आदेश आज दिनांक २३/०३/२०१८ रोजी माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिला असे.

DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETY NASIK TALUKA NASIK

दिनांक २३/०३/२०१८
ठिकाण नाशिक.

( **डॉ.प्रिया दळणर** )
उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

**प्रति,**

१) माजी चेअरमन / संचालक / सचिव, ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., तपोवनरोड,नाशिक ता.जि.नाशिक

२) श्री पी.आर.शिंपी ,प्राधिकृत अधिकारी, ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., टाकळीरोड,नाशिक ता.जि.नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामकाजाचा पदभार श्री आर.सी.गजरे यांचेकडून घ्यावा व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

३) श्री.आर.सी.गजरे,प्राधिकृत अधिकारी, ड्रिमसिटी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., टाकळीरोड,नाशिक ता.जि.नाशिक

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामकाजाचा पदभार श्री पी.आर.शिंपी यांना देण्यात यावा व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

१) शाखाधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक शाखा -मुक्तीधाम,नाशिक
२) शाखाधिकारी, पंजाब महाराष्ट्र बॅक शाखा- शिवाजीनगर
३) शाखाधिकारी, स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद शाखा- शिवाजीनगर
४) शाखाधिकारी, स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा- शिवाजीनगर

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१)मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.
२)मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.

उपनिबंधक